# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/6980/२०१७ पुणे शहर दिनांक 04 /०९/२०१७

पुणे शहरात येरवडा वाहतुक विभागात तारकेश्वर चौकाकडून शहादलबाबा चौकाकडे जाणा-या रोडवर चिमा घाट विसर्जन ठिकाण आहे. सदर विसर्जन घाटावर दि.०५/०९/२०१७ (१२ व्या. दिवशी) येरवडा, गांधीनगर, नवी खडकी याभागातील सार्वजनीक तसेच घरगुती गणपती विसर्जनकरीता मोठया प्रमाणात येत असल्याने पर्णकुटी चौक, तारकेश्वर चौक व शहादलबाबा चौक येथे मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी निर्माण होत असते. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, खालील चौकात तात्पुरते आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**१) तारकेश्वर चौक - दि.०५/०९/२०१७ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेतू नवीन पुलावरुन शहादलबाबा चौकामार्गे खडकी, संगमवाडीकडे जाणारी वाहतुक बंद करणेत येत असून तारकेश्वर चौक येथून खडकी , संगमवाडीकडे जाणारी वाहतुक ही पुर्णकुटी चौक – गुंजन चौक– गोल्फ क्लब चौक – डॉ.आंबेडकर चौक – शहादलबाबा चौक यामार्गे वळविण्यात येत आहे.**

**२) शहादलबाबा चौक –संगमवाडी , खडकी यामार्गे शहादलबाबा चौकातून येरवडाकडे जाणारी वाहतुक बंद करणेत येत असून संगमवाडी , खडकी भागातून येणारी व नगरकडे जाणारी वाहतुक ही शहादलबाबा चौक – डॉ.आंबेडकर चौक – गोल्फ क्लब चौक - शास्त्रीनगर चौकातून नगररोडकडे वळविण्यात येत आहे.**